**धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई**

**येशूचे देवालयात समर्पण रविवार** **२ फेब्रुवारी २०२०**

**श्रध्दावंतांच्या प्रार्थना**

**धर्मगुरू** ः बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप, बिशप्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना परमेश्वराची कृपा व चांगल्या आरोग्याचे दान मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. पवित्र मरिया आणि संत योसेफ ह्यांनी येशू बाळाला येरूसलेमच्या मंदिरात समर्पित केले. मुलांना सतत देवधर्माची गोडी लावण्यास ईश्वराने आपणांस प्रेरणा द्यावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आज कुटुंबासमोर असलेल्या नानाविध आव्हांनाना सामोरे जाण्यास आपले कुटुंब समर्थ असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामातील सर्व नवविवाहितांवर परमेश्वराचा भरपूर आशीर्वाद असावा, परमेश्वराच्या कृपेने त्यांना कौटुंबिक जीवनात सुख मिळावे व त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण व्हाव्यात म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. संत गोन्सालो गार्सियाची मध्यस्थी आपल्या धर्मग्रामातील प्रत्येक व्यक्तीवर असावी व चर्च कार्यास सहकार्य करणा-या सर्वांना परमेश्वराची कृपा लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

<u>धर्मगुरू</u>ः हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंतःकरणाने ते तुझी सेवा करोत. श्रध्देने आम्ही तुझ्या साहाय्याची याचना केली आहे. आता आमच्या जीवनात तुझ्या दयेची आणि प्रेमाची जाणीव करून दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.